# मराठी साहित्य आणि संस्कृती

**शशिकला भिमराव रणदिवे**

सहाय्यक प्राध्यापक, गिरिस्थान आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज,
महाबळेश्वर, जिल्हा सातारा.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259907

## ABSTRACT:

मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती समृद्ध परंपरा, संस्कृती आणि भावविश्व घेऊन उभी आहे. मराठी साहित्य आणि संस्कृती यांचे नाते अतूट आहे, जेथे साहित्य संस्कृतीचा आरसा आहे आणि संस्कृती साहित्याला पोषण देणारी भूमी आहे. संस्कृती ही समाजाची जीवनपद्धती असून त्यात भौतिक, मानसिक घटक, रूढी आणि मूल्ये समाविष्ट आहेत. साहित्य हे एक सांस्कृतिक घटक ठरून संस्कृतीच्या जडणघडणीत सहभागी होते. लेखकाच्या प्रतिभेतून व संवेदनशीलतेतून संस्कृती सिद्ध होते. अव्वल इंग्रजी कालखंडात श्रवण संस्कृतीकडून वाचन संस्कृतीकडे झालेले संक्रमण महत्त्वाचे ठरले. आधुनिक साहित्याने स्वातंत्र्य, समता आणि लोकशाहीची मूल्ये स्वीकारली. थोडक्यात, साहित्य आणि संस्कृतीने परस्परांवर प्रभाव टाकत समाजमन घडवले आहे.

## KEYWORDS:

मराठी साहित्य, संस्कृती, वाचन संस्कृती, समाजमन, मूल्ये.

मराठी भाषा हे केवळ संवादाचे साधन नाही तर ती एक समृद्ध परंपरा, संस्कृती आणि भावविश्व घेऊन उभी आहे. मराठी साहित्य आणि संस्कृती यांचा परस्पराशी घट्ट संबंध आहे. साहित्य हे संस्कृतीचा आरसा आहे, तर संस्कृती ही साहित्याला पोषण देणारी भूमी आहे. मराठी भाषा ही एक समृद्ध व प्राचीन भाषा आहे. तिचे साहित्य आणि संस्कृती यांच्याशी अतूट नाते आहे. साहित्य म्हणजे समाजाचे प्रतिबिंब, तर संस्कृती म्हणजे समाजाच्या जीवनपद्धतीचे दर्शन. समाजाच्या जीवनपद्धतीतून संस्कृती तयार होते आणि त्या संस्कृतीचे जिवंत चित्रण साहित्य करीत असते. संस्कृती या कल्पनेत समाजाची भौतिक

साधनसामग्री, तसेच रूढी, शारीरिक, मानसिक सवयी व मूल्ये यांचा समावेश होतो. संस्कृतीचे हे सर्व घटक मानवी समाजाच्या गरजांचीही प्रत्यक्षअप्रत्यक्षपणे पूर्ती करीत असतात. विशिष्ट समाजाच्या गरजा काय आहेत आणि समाजात त्यांची पूर्ती कोणत्या प्रकारे केली जाते, यावरून खरे तर समाजाच्या प्रगतीविषयी विधान करता येते. ज्या समाजाच्या प्राथमिक व सांस्कृतिक गरजांचा स्तर उंचावत जात असेल आणि त्यांच्या पूर्तीसाठी सामाजिक व्यवहारांची उभारणी होण्याची प्रक्रिया ज्या समाजात गतिमान असेल, त्या संदर्भात तो समाज प्रगतीपथावर आहे असे म्हणता येते. संस्कृतीच्या अशा व्यापक कल्पनेच्या संदर्भात साहित्य ही एक सांस्कृतिक घटक ठरत असते.

साहित्य आणि संस्कृती यांचे हे नाते दुहेरी असते. एका बाजूने संस्कृती ही साहित्याच्या निर्मितीचे कारण ठरत असते, तर दुसऱ्या बाजूने साहित्य ही एक सांस्कृतिक शक्ती ठरून संस्कृतीच्या जडणघडणीत सहभागी होत असते. संस्कृती आणि साहित्य यांचा विचार करताना तो नुसता तात्विक पातळीवर करावयाचा नाही, तर मराठी या विशेषणाच्या अनुषंगाने आहे. म्हणजे मराठी जनजीवनाच्या अनुषंगाने साहित्य आणि संस्कृतीचा विचार करावयाचा आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता समाजाचा एक घटक म्हणून लेखक ही व्यक्ती सांस्कृतिक संचित स्वीकारत असते हे खरे, पण ही व्यक्ती केवळ सामान्य व्यक्ती नसते. ती प्रतिभावंत व्यक्ती असते. आपल्या सांस्कृतिक संचिताला वेगळा प्रतिसाद देऊन काही नवे निर्माण करण्याची क्षमता असणारी अशी ही व्यक्ती असते. ही व्यक्ती सांस्कृतिक संचिताच्या चष्म्यातून जग पाहत नाही. (सर्वसामान्य माणसे ते तसे पाहतात. व्यवहारासाठी ते सोयीचे असते.) ही व्यक्ती जग नव्याने पाहते आणि वाचकाला नव्याने पाहायला लावते. लेखकाच्या संवेदनशीलतेने, त्याच्या मूल्यभावाने साहित्यातील वास्तव संस्कारित होत असते आणि ते वास्तव अनुभवणारा वाचकही ती संवेदनशीलता व मूल्यभाव यांचा संस्कार घेत असतो. अशा रीतीने विशिष्ट संस्कृतीचा घटक असणाऱ्या व्यक्तीच्या निर्मितीतून संस्कृती सिद्ध होत असते. कलानिर्मितीचे सांस्कृतिक महत्त्व आहे ते हे असे. लेखकाच्या संस्कृती या संकल्पनेच्या जगभरामध्ये आठशे पेक्षा अधिक व्याख्या करण्यात आलेल्या आहेत. म्हणजे कुठली एक व्याख्या संस्कृती या संकल्पनेचे स्पष्टीकरण करू शकत नाही. कारण संस्कृतीमध्ये असंख्य गोष्टी येतात आणि

तिच्यामध्ये सतत बदलही होत राहतो. शंभर वर्षांपूर्वी असलेल्या अनेक गोष्टी आज नष्ट झालेल्या तरी दिसतील किंवा बदललेल्या तरी दिसतील. तरीही आपण शंभर वर्षांपूर्वीच्या गोष्टींना संस्कृती असे म्हणतो आणि आजच्या गोष्टींनाही संस्कृती असेच म्हणतो. म्हणजेच संस्कृती एक अत्यंत व्यापक आणि सतत बदलणारी गोष्ट आहे.

आज साहित्य आणि संस्कृती या दोन्ही संकल्पना वेगवेगळया ज्ञानशाखांचा विषय होत आहेत. आज समाजशास्त्र, मानसशास्त्र यांसारखी सामाजिकशास्त्रेही साहित्याचा विचार करीत असतात, तर संस्कृती ही संकल्पना इतिहास, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र यांसारख्या सामाजिक शास्त्रांचा विषय होत असते. या सर्व ज्ञानशाखांमध्ये साहित्य आणि संस्कृती हे शब्द येत असले तरी अनेकदा त्या शास्त्रांना त्यांचे अभिप्रेत अर्थ भिन्न भिन्न असतात. संस्कृतीचा पट फार मोठा असतो. किंबहुना संस्कृतीमध्ये काय येत नाही, असे विचारले तर सारे काही येते, असे सांगावे लागते. रूढी, परंपरा, सण उत्सव, समजुती, गैरसमजुती, जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सर्व संस्कार, देवदेवता, यात्रा, जत्रा अशा खूप गोष्टींचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. याहीपेक्षा महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश संस्कृतीमध्ये केला जातो. त्या त्या प्रदेशाचा इतिहास संस्कृतीला काही बरावाईट आकार देणारा ठरू शकतो. इतिहासातील ज्ञातअज्ञात बऱ्याच गोष्टी संस्कृतीला आकार देत असतात. उदा. दिवाळीला होणारे बळीचे स्मरण किंवा उत्तर भारतात घडणारे रावण दहन हे इतिहासाचे अवशेष आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात बोलायचे तर मराठ्यांच्या पराक्रमाने येथील संस्कृतीत काही गोष्टी आल्या. छत्रपती शिवरायांबद्दलचा पूज्यभाव हा त्याचाच भाग आहे.

संस्कृती ही कल्पना अशी व्यापक व गुंतागुंतीची असल्यामुळेच मनुष्य समाजाची डोळयांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळयांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय. संस्कृती मग ती द्रव्यरूप असो वा मनोमय असो, हे सकळा इंद्रियांना लावलेले एक विशिष्ट वळण असते. अशा शब्दांत इरावती कर्वे यांनी संस्कृतीचे वर्णन केले आहे, तर संस्कृती हा शब्दानिर्थानी भिन्न प्रसंगी वापरलेला असतो. मनुष्याने निर्मिलेले आध्यत्मिक व आधिभौतिक विश्व एका अर्थात समाविष्ट होते, तर दुसऱ्या अर्थात माणसाच्या मानसिक उन्नतीचाच समावेश होतो, असे तर्कतीर्थ

लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी स्पष्टीकरण केले आहे.

संस्कृती ही माणसाच्या वर्तनातून व्यक्त होत राहते. जशी संस्कृती तसे माणसाचे व समाजाचे वर्तन असते. या वर्तनाचा लघुतम साधारण विभाजक म्हणजे संस्कृती असे म्हणता येईल. या संस्कृतीने मग श्रेष्ठ काय, कनिष्ठ काय ते ठरवलेले असते. नैतिकअनैतिक, पवित्रअपवित्र इ. साऱ्याच गोष्टी निश्चित झालेल्या असतात. त्यांना मूल्यात्मक रूप प्राप्त झालेले असते व ही सारी मूल्ये त्या त्या संस्कृतीमध्ये वावरणाऱ्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वात भरून जातात, अंगभूत होतात. त्याप्रमाणे तो प्रतिक्रिया देतो किंवा त्यातूनच त्याचे भावविश्व साकार झालेले असते. त्या भावविश्वाच्या अनुषंगाने त्याच्या प्रतिक्रिया आणि सगळे जगणे आकाराला येत असते.

समाजातील सर्व प्रथा, श्रद्धा, रूढी, इ. सर्वांचाच संस्कृतीत समावेश होतो. एकंदरीत विशिष्ट समाजाचा घटक म्हणून व्यक्ती जे जे आत्मसात करते, त्या साऱ्यालाच समाजशास्त्रीय अर्थाने संस्कृती म्हटले जाते. संस्कृतीची ही कल्पना तुलनात्मक पद्धतीने स्पष्ट होऊ शकते. आपण अभ्यासत असलेल्या समाजाच्या संस्कृतीची आपणास ज्ञात असणाऱ्या इतर समाजाच्या संस्कृतीशी तुलना करूनच विशिष्ट संस्कृतीचा वेगळेपणा दाखविता येणे शक्य असते. म्हणून त्या दृष्टीने पाहताना मूल्यमापनाचा प्रश्नच उद्भवत नाही. येथे संस्कृती म्हणजे वर्तनाचे भिन्न भिन्न रचनाबंध तरी असतात किंवा वर्तनाच्या सामाजिक संरचना असतात. संस्कृती म्हणजे जीवनपद्धती असे म्हटले म्हणजे त्या दृष्टीने चंबळच्या दरोडेखोरांचीही संस्कृती असते आणि एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील नवशिक्षितांचीही संस्कृतीच असते.

व्यक्त होणे हा माणसाचा मूलभूत धर्म आहे. ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. म्हणून माणूस संस्कृतीच्या प्रारंभापासून व्यक्त होत आहे. त्याने कथा सांगितल्या, निर्माण केल्या, त्याला आपण लोककथा म्हणतो. त्याने गीते गायली, त्याला आपण लोकगीते म्हणतो. त्याने काही सादरीकरणे केली, त्याला आपण तमाशा, दंडार, दशावतारी इ. लोकनाट्य म्हणतो. ही व्यक्त होण्याची परंपरा आजतागायत सुरूच आहे. आज आशयात, रूपात बदल झाले असतील, पण व्यक्त होणे सुरूच आहे. हे व्यक्त होणे हळूहळू निर्मितीच्या पातळीवर जाते. त्यात जसे पाहिलेले, सहिलेले

असते, तसे कल्पनेच्या पातळीवरून बघितलेलेही असते. हे कल्पनेचे जगही पुन्हा वास्तवाशी समकक्षच असते. मुळात कोणत्या अनुभवांना साहित्य म्हणावे याविषयीचे काही संकेत प्रत्येक समाजात असतात. ते परंपरेने आलेले असतात. म्हणजे कोणत्याही समाजातील साहित्य ही कल्पनाच त्या समाजाचे सांस्कृतिक अंग असते. साहित्य निर्माण करणारा साहित्यिक या परंपरेच्या चौकटीत कार्य करीत असतो. हा व्यक्त होणारा जो कोणी कलावंत असतो, तो अंतिमतः एका संस्कृतीचाच घटक असतो. त्या समाजात भोवतालच्या पर्यावरणामध्ये तो जगत असतो. असे जगणे जगता जगताच त्याला काहीतरी व्यक्त करावेसे वाटते, निर्माण करावेसे वाटते. या प्रेरणेतून तो साहित्य निर्माण करतो, चित्र निर्माण करतो, शिल्प निर्माण करतो आणि साऱ्या कलाच तो निर्माण करीत असतो. एका प्रकारे प्रत्येक कलेचा आविष्कार हा संस्कृतीच्या प्रांगणातील आविष्कार असतो.

संस्कृती या शब्दाच्या एका अर्थात माणसाच्या मानसिक उन्नतीचा समावेश होतो असे म्हटले जाते. या दृष्टीने पाहता संस्कृती ही क्रियाशील जिवंत शक्ती असते. साहित्याला बळ व रूप देणारी सामाजिक मूल्ये व संवेदनशीलता यामध्ये ही संस्कृती पाहता येते. या संस्कृतीचा संबंध समाजाच्या एकंदर जीवनपद्धतीशी नसतो, तर विशिष्ट जीवनानुभवांना प्रतिसाद देणाऱ्या व्यक्तीमनाशी असतो. विशेष गुणवत्ता असणाऱ्या व्यक्तींनी विशिष्ट काळातील एकंदर सामाजिक क्षमतेला दिलेल्या सार्थ प्रतिसादातून ही संस्कृती सिद्ध होत असते. ती नुसती घडणारी प्रक्रिया नसते, तर ही संस्कृती म्हणजे जाणीवपूर्वक केलेली सिद्धी असते. श्रेष्ठ मानवी मूल्यांचा, प्रज्ञाप्रतिभेचा या संस्कृतीत साक्षात्कार होत असतो. संस्कृतीतले चांगले काय आणि वाईट काय याचा विवेक करीत असतो. नवे जग निर्माण करताना हा विवेक फार महत्त्वाचा ठरतो. या पातळीवर लेखक, कलावंत आला की, तो भोवतीच्या पर्यावरणात वाहूनही त्यातून मुक्त होतो. तो एकूण माणसासंबंधी, चिरंतन मूल्यांसंबंधी विचार करायला लागतो. चिंतनाच्या पातळीवर तो उन्नत होत जातो. निदान चांगल्या लेखककलावंतांची ती कसोटीच असते.

सत्य असत्याशी मन केले ग्वाही\! मानलेले नाही बहुमता. असे जेव्हा संत कवी तुकाराम म्हणतात, तेव्हा ते चांगल्या लेखकाची लक्षणे ध्वनीत करीत असतात. साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे व

साहित्यनिर्मितीची भाषा हे त्याचे माध्यम आहे. मानवी जीवन व साहित्य या दोन्ही गोष्टी समाजाधिष्ठित आहेत. काव्याचा उगमच मुळी सामूहिक धार्मिक विधीतून झालेला आहे. मराठी साहित्य १२ व्या शतकापासून निर्माण झालेले असले आणि आपल्या साहित्याच्या या परंपरेचा आजच्या साहित्याशी व साहित्यविषयक वातावरणाशी संबंध असला तरी मराठी साहित्याच्या संदर्भात प्राचीन, अर्वाचीन हा भेद फार महत्त्वाचा आहे. या अर्वाचीन कालखंडात मराठी समाजाचा पाश्चात्त्य संस्कृतीशी जो संबंध आला, त्या संबंधाचेच आपल्या आजच्या साहित्य संस्कृतीशी अधिक प्रभावी नाते आहे. ब्रिटिश सत्तेमुळे समाजात झालेले परिवर्तन, भौतिक जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीतील झालेला बदल, व्यक्तीस्वातंत्र्यासारख्या नव्या मूल्यांचा झालेला उदय, औपचारिक शिक्षण पद्धतीची झालेली सुरुवात आणि त्यामुळे इंग्रजी साहित्याशी झालेला परिचय या सर्वांमुळे मराठी समाजातील साहित्यदृष्टी मुक्त झाली. याचबरोबर छपाईची कला, नियतकालिकांचा उदय, या आधुनिक शिक्षणसंस्थांची स्थापना, इत्यादी घटकांमुळे समाजात साहित्यविषयक एक वेगळी जाणीव निर्माण होऊ लागली. या सर्व परिवर्तनातून आधुनिक साहित्य संस्कृतीची जडणघडण होऊन गेली आहे. म्हणूनच आजच्या साहित्य संस्कृतीच्या संदर्भात ब्रिटिश सत्तेचा हा कालखंड महत्त्वाचा ठरतो.

एक मोठे परिवर्तन अव्वल इंग्रजी कालखंडात आले. ते म्हणजे भारतीय माणूस श्रवण संस्कृतीतून वाचन संस्कृतीमध्ये आला. पूर्वी पुराण, कीर्तन, प्रवचन अशा लोकप्रकटन संस्थांमधून काहीतरी ऐकवले जाई आणि इतर सारे ऐकत. आता ऐकण्यापेक्षा वाचणे महत्त्वाचे झाले. शिवाय शिक्षणाच्या प्रसारप्रचारामुळे वाचू शकणाऱ्यांची संख्याही क्रमाने वाढत चालली. वाचनासाठी पुस्तके आली. एकावेळी सारख्याच पुस्तकांच्या हजारो प्रती येऊ लागल्या. श्रवणाकडून वाचनाकडे वळणे ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील फार मोठी क्रांती होती.

मराठी साहित्याबद्दल विचार करताना आधुनिक कालखंडाचा विचार करणे अधिक योग्य होईल. इंग्रजांच्या आगमनानंतर भारतभर आणि महाराष्ट्रातही भारतीय धर्माचा आणि संस्कृतीचा पुनर्विचार सुरू झाला. राजा राम मोहन रॉय, दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, महात्मा ज्योतिराव फुले, लोकहितवादी आदी

मंडळी आपल्या धर्माचा आणि संस्कृतीचा पुनर्विचार करू लागली. साहित्य ही आकाशातून एकाएकी टपकणारी गोष्ट नाही. किंबहुना कुठलीही कला ही आकाशातून टपकत नाही. ती माणसाच्या सगळया श्रमातून, माणसाच्या कित्येक हजारो वर्षांच्या वारशातून उभी होत आलेली असते. त्यामुळे तिला एक मोठा परंपरेचा आधार असतो. त्या परंपरेशिवाय तिचा विचार करणे ही चुकीची गोष्ट आहे आणि प्रत्यक्षात ती खरीही नसते. वास्तवाचा विचार करायचा असला तर ते वास्तव एकाएकी आलेले नाही, आपोआप आलेले नाही. ते गेल्या कित्येक हजार वर्षांच्या परंपरेतून आलेले आहे. याचे भान आपल्या सगळयांनाच हवे. हा विचार केल्यानंतर संस्कृतीचा थोडा विचार करू.

संस्कृती म्हणजे जगण्याची रीत. म्हणजे आपण कसे जगतो, काय बोलतो, काय खातो, कशावर वाद घालतो, कोणाचा आदर करतो ह्या सगळयांचा जो संबंध आहे, ही जगण्याची जी रीत आहे, ती संस्कृतीचा एक मोठा भाग आहे. डॉ. गोविंद पानसरेंचे हे विधान मला खूप आवडणारे आहे आणि अतिशय सोपे आहे. या संस्कृतीमधला एक महत्त्वाचा भाग आहे, तो म्हणजे साहित्याचा, कलांचा. संस्कृतीची उत्पत्ती, जतन व संक्रमण भाषेच्या द्वारे होते. भाषा हे संस्कृतीचे एक प्रभावी अंग आहे. भाषेशिवाय संस्कृतीची निर्मिती ही होणार नाही व संक्रमणही होणार नाही. संस्कृती व्यक्तीच्या जीवनक्रमात नसल्यास संस्कृतीची निर्मिती होणे अशक्य आहे. सांसारिक उपाधीतूनच संस्कृतीची निर्मिती होते. मनुष्य आपली सर्व भौतिक व मानसिक संपत्ती ठेवून जातो व पुढच्या पिढीला उपयोगी पडते. हेच संस्कृतीचे मुख्य बीज आहे. मानव इतर ज्ञानापासून परंपरागत वस्तूंचा व मूल्यांचा वारसदार होऊ शकतो. म्हणून संस्कृती निर्माण होते, जतन होते व वाढीस लागते. अशा रीतीने संस्कृती म्हणजे विशिष्ट मानवी समाजाची एकंदर जीवनपद्धती आणि साहित्य म्हणजे भाषेच्या द्वारे व्यक्त झालेला वैशिष्ट्यपूर्ण जीवनानुभव असे मानले तर सांस्कृतिक संदर्भाशिवाय साहित्य संभवतच नाही असे म्हणता येते. साहित्य आणि संस्कृती हे एकमेकांचे संवर्धक आहेत. साहित्यही संस्कृतीच्या भिन्नतेचे दर्शन घडवते. साहित्यामध्ये संस्कृतीतील इष्टाबरोबर अनिष्टाचेही दर्शन घडते. ऐतिहासिक घटनांचा परिणाम संस्कृती परिवर्तनात पर्यायाने साहित्य रूपातही बदल होतो.

संस्कृती बदलली की साहित्याचे रूपही बदलते. संत साहित्याने

भक्ती व नीती दिली, तर आधुनिक साहित्याने स्वातंत्र्य, समता, लोकशाही यांची कास धरली. अशा प्रकारे साहित्य व संस्कृतीने परस्परांवर प्रभाव टाकत समाजमन घडवले आहे. मराठी साहित्य आणि संस्कृती हे महाराष्ट्राचे प्राण आहेत. या परंपरांचा वारसा आजही जतन केला जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही साहित्यसंस्कृती ही आपली ओळख आणि अभिमानाचे प्रतीक राहिली आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

1. मराठी साहित्याची समाज आणि संस्कृती, आनंद यादव, मेहता पब्लिकेशन हाऊस.
2. मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, समाज व संस्कृती, कृ. ना. चिटणीस.
3. भारतीय संस्कृती, साने गुरुजी, साधना प्रकाशन, पुणे.
4. धार आणि काठ, नरहर कुरुंदकर, देशमुख आणि कंपनी, पुणे.
5. साहित्याचा अन्वयार्थ, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, मेहता पब्लिकेशन हाऊस.
6. साहित्याचा परिघ, डॉ. निशिकांत ठकार, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
7. टीका स्वयंवर, भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
8. गांधी आणि आधुनिक मराठी साहित्य, संपादक डॉ. द. दि. पुंडे, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

**Funding:**
This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**
The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**
© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.